साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२५ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशु प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## नगराध्यक्षपदाच्या आरक्षणासाठी मुंबईत सोमवारी सोडत

मुंबई (बातमीदार):- होऊ घातलेल्या नगर परिषदा व नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी राज्यातील २४७ नगर परिषद व १४७ नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण निश्चितीसाठी सोमवारी (दि.६) मुंबईत मंत्रालयात या आरक्षणाची सोडत होणार आहे. मंत्रालयातील परिषद सभागृह, ६ वा मजला येथे दुपारी ही सोडत होणार असून यासाठी विविध पक्षांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले आहे.




या सोडतीकडे राज्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांचे लक्ष लागले आहे. मोठ्या कालखंडानंतर या निवडणुका होत आहेत. येत्या ३१ जानेवारी पूर्वी निवडणुका घ्याव्यात असे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. आपल्या गावातील पंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण कुणाला सुटते याकडे या नेतेमंडळींचे लक्ष आहे. नगराध्यक्ष पदासाठी नेते बाशिंग बांधून तयार आहेत. बीड जिल्ह्यातील बीडसह अंबाजोगाई, परळी, माजलगाव, गेवराई व धारूर या नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण यावेळी निश्चित होणार आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षाच्या नेते, कार्यकर्त्यांचे या सोडतीकडे लक्ष आहे. दरम्यान, येत्या बुधवारी (दि.८) नगर परिषदेतील नगरसेवकांचे आरक्षणही काढले जाणार आहे. या आरक्षणानंतर या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होण्यास मदत होईल. आपल्या गावातील नगराध्यक्ष व नगरसेवकांचे आरक्षण कोणत्या प्रवर्गाला सुटेल याकडे सर्वसामान्यांचे लक्ष आहे.**

## घरकुल बांधकाम योजनेत परळी तालुका जिल्ह्यात आघाडीवर

बीड (बातमीदार):- प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल बांधकामात बीड जिल्ह्यातून परळी तालुका प्रथम आला आहे. या योजनेत बीड जिल्ह्यात ३ ऑक्टोबर पर्यंत २३ हजार ६४० घरकुले पूर्ण झाली असून सप्टेंबरपासून घरकुल बांधकामात बीड जिल्हा राज्यात प्रथमस्थानी आहे. या जिल्ह्यासाठी घरकुलाचे उद्दिष्ट्य एक लाख ७० हजार ९०३ एवढे होते. त्यापैकी एक लाख ६४ हजार ८७ घरकुले मंजूर झाली आहेत. परळी तालुक्यात ११ हजार ९१५ घरकुले पूर्ण झाली आहेत. त्यामुळे परळी तालुका बीड जिल्ह्यात आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ वडवणी व धारूर ही तालुके आहेत. जिल्ह्यात घरकुलाचा लाभ घेणाऱ्या एक लाख ४९ हजार १५२ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत झालेला आहे. या शिवाय दोन लाख २१ हजार ९१४ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे वितरण झालेले आहे अशी माहिती सुत्रांनी दिली.

## दसऱ्यानिमित्त श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व कालरात्री देवीच्या पालखी मिरवणुकीने परळीतील नवरात्र उत्सवाची सांगता

परळी वैजनाथ, (बातमीदार) :- येथील प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व श्री कालरात्री देवीचा जयघोष करत विजयादशमीनिमित्त गुरूवारी (दि.०२) सायंकाळी 'प्रभू वैद्यनाथ' व 'कालरात्रीदेवी' या भावंडाच्या शहरातून वाजतगाजत निघालेल्या पालखी मिरवणुकीने येथील नवरात्र उत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता झाली. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या पालखी मिरवणूकीत शेकडो भाविक सहभागी झाले होते. तर हजारो भाविकांनी या दोन्ही पालख्यांचे दर्शन घेतले.



दसऱ्यानिमित्त 'वैद्यनाथ ज्योतिर्लिंग', शहरातील 'कालरात्रीदेवी' व परिसरातील 'डोंगरतुकाई देवी'चे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. शहरातील वैद्यनाथ मंदिरातुन सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पारंपारिक पध्दतीने वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची सजवलेल्या पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. शहराच्या मुख्य मार्गावरुन वाजत-गाजत व वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या नामाचा जयघोष करत ही मिरवणूक निघाली. या पालखीत यंदा महादेवाच्या रूपात श्री महादेव, नंदी असे जिवंत देखावे सादर करण्यात आले होते. हे या पालखीचे यंदाचे आकर्षण होते. ही पालखी अंबेवेस, नांदूरवेस, गणेशपार मार्गे कालरात्रीदेवी मंदिराकडे मार्गस्थ झाली. पालखी मिरवणूकीत देवस्थान संस्थेचे विश्वस्त राजेश देशमुख, सचिव प्रा.बाबा देशमुख, नंदकिशोर जाजू, अनिल तांदळे, प्रा.प्रदीप देशमुख, डॉ.गुरुप्रसाद देशपांडे, रघुवीर देशमुख यांच्यासह इतर विश्वस्त, नागरिक, मानकरी, देवस्थान संस्थेचे कर्मचारी, भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पालखी मार्गावर शेकडो भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले, पूजाही केली. पालखीच्या स्वागतासाठी भाविकांनी पालखी मार्गावर सडा, रांगोळी काढली होती. वाघ्या, मुरळी, गोंधळी, वासुदेव, बँण्ड पथक पालखीच्या समोर होते. ही पालखी शहरातील 'कालरात्रीदेवी' मंदिर परिसरात आल्यानंतर या मंदिर परिसरात शहरातील हजारो नागरिकांनी एकमेकांना आपट्याची पाने (सोनं) देऊन दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर 'कालरात्रीदेवी' व 'श्री वैद्यनाथ' या बहिण भावाच्या पालखीची भेट झाल्यानंतर दोन्ही पालखीच्या मिरवणुका सीमोल्लंघनासाठी शहराच्या परिसरातील 'बटूभैरव' मंदिराकडे मार्गस्थ झाल्या. रात्री उशीरापर्यंत या पालखीच्या मिरवणुका चालल्या होत्या. या पालखी मिरवणुकीनंतर येथे गेली दहा दिवस सुरु असलेल्या नवरात्र उत्सवाची सांगता झाली. दसऱ्यानिमित्त वैद्यनाथ मंदिरासह कालरात्री देवी, डोंगरतुकाई देवी मंदिरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. शहर व परिसरात विजयादशमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, शहरातील अंबाजोगाई मार्गावरील शंकर-पार्वतीनगर भागातील हिंगुलांबिकादेवीच्या पालखीही दुपारी वाजतगाजत शहरातून काढण्यात आली. या पालखीत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ***

## ग्लोबल विकास ट्रस्टकडून किराणा किटचे अतिवृष्टीग्रस्त शेतकरी कुटुंबियांना वाटप

परळी वैजनाथ (बातमीदार):- शेतकऱ्यांचे दु:ख वाटून घेता येणे अशक्य आहे. नैसर्गिक संकटे आणि आपत्तीशी नेहमी संघर्ष करावा लागलेल्या बळीराजाचे दु:ख डोंगराएवढे मोठे असून यंदाच्या अस्मानी संकटाने शेतकरी राजा पूर्णत: कोसळला आणि ढासळला आहे. झालेल्या अतिवृष्टीने शेतातील पिके वाहून गेली, त्याबरोबरच शेतातील सुपीक मातीही खरवडून वाहून गेली. अनेक गावांतील नद्या नाले तुडुंब वाहिल्याने मोठे नुकसान झाले आहे. यामुळे दबलेला आणि खचलेला शेतकरी दसरा आणि दिवाळी काशी साजरी करणार? ऐन सणासुदीच्या दिवसांत अतिवृष्टीने त्याच्या आनंदावर विरजण पडले. अशा अवस्थेत जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेली ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आली आहे. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशन आणि बोरोसिल रिन्यूबल्सच्या सहकार्याने नुकसानग्रस्त




शेतकरी कुटुंबियांना किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना छोटीसी मदत म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत असून याचा बुधवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी भिलेगाव येथून जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. ३ हजार पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबियांना याचा थेट लाभ होणार आहे.

जागाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाचे दु:ख आणि परिस्थिती पाहून मनाला अतिव वेदना होतात. मी गावोगावी जाऊन जेंव्हा परिस्थिती पाहिली तेंव्हा मात्र मला रात्रभर झोप लागली नाही. आज सणासुदीच्या काळात शेतकरी संकटात सापडल्याने त्यांचे कुटुंबीय आणि मुलाबाळांचा आनंद हिरावून घेतल्याप्रमाणे झाले होते. आता पुढे कसे होणार? दसरा - दिवाळीला पैसे कोठून आणणार? असा प्रश्न त्यांना भेडसावू लागला होता. वास्तविक परिस्थिती पाहून त्यांना मदत करायला पाहिजे असा विचार माझ्या मनात आला. मी मागील काळात जवळपास ६७ वर्षांचे आयुष्य जगलो. एवढ्या वर्षांत मी शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्न खाल्ले. त्याची उतराई होणे शक्य नाही मात्र शक्य होईल तेवढे जास्तीत जास्त काम शेतकऱ्यांसाठी मला करायचे आहे. याच भावनेतून मी मदतीसाठी काही फोन लावले आणि त्यांच्याकडूनही होकार आला. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशन आणि बोरोसिल रिन्यूबल्सने मदतीचा हात पुढे केल्याने आम्ही हजारो शेतकरी कुटुंबियांना किराणा सामानाचे वितरण करत आहोत. शेतकऱ्यांना त्यातून थोडा दिलासा मिळू शकेल आणि त्यांच्याही घरात दसरा दिवाळी उत्साहात साजरी केली जाईल याचे मला मनस्वी समाधान वाटत असल्याची प्रतिक्रिया जलनायक मयंक गांधी यांनी व्यक्त केली.

तालुक्यातील मौजे भिलेगाव येथे किराणा किट वितरण उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. विठ्ठल रखुमाई मंदिर येथे आयोजित बैठकीस गावातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती. भिलेगाव येथील शेकडो कुटुंबियांना किराणा किटचे वितरण करण्यात आल्यानंतर ग्रामस्थांनी जलनायक मयंक गांधी यांच्यासह सर्व संयोजकांचे आभार मानले.

**किराणा किटमध्ये २२ वस्तूंचा समावेश- परळी वैजनाथ तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले असून ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने शेतकरी कुटुंबियांना किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. ३ हजार पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबियांना ही मदत केली जाणार आहे.**

**मदत म्हणून दिल्या जाणाऱ्या किराणा किटमध्ये एकूण २२ अत्यावश्यक वस्तूंचा समावेश आहे. गहू आटा बॅग, साखर, तांदूळ, तेल, चणाडाळ, पोहे, शेंगदाणे, रवा, मैदा, मीठ, गुळ, तूरडाळ, मुगडाळ, मसुरदाळ, मुरमुरे, चहा पत्ती, लाल मिर्ची पावडर, हळद, जिरे, खोबरे तेल, अंगाची साबण तसेच निरमा आदी वस्तूंचा या किटमध्ये समावेश करण्यात आला आहे. ****

# परळीच्या बस स्थानक इमारतीचे काम सुरू करा - राजेभाऊ फड

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी वैजनाथ बस स्थानक पुनर्बांधणी कामाच्या परवानगी संदर्भात येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी भाष्य केले आहे. परळी वैजनाथ बसस्थानक पुनर्बांधणी कामाकरिता राज्य परिवहन विभागाकडून ३ डिसेंबर २०२४ रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली होती.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी अजय ठाकूर अँड असोसिएट्स संभाजीनगर यांची वास्तुविशारद म्हणून निवड केलेली आहे परंतु त्यांनी दिनांक २१ जून २०२५ रोजी च्या पत्रान्वये मा. विभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीड विभाग यांना असे कळविले की सदर बस स्थानकासाठी प्रथम बांधकाम परवाना घेणे आवश्यक आहे सदर बांधकाम



परवाना प्रस्तावासाठी लागणारे कागदपत्राची अजून पर्यंत पूर्तता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कडून करण्यात आलेली नाही. कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर बांधकाम परवाना साठी प्रस्ताव दाखल करण्यात येईल. बांधकाम परवाना घेतल्यानंतरच नवीन इमारतीचे काम सुरू करावे असे पण त्यांनी कळविले आहे. परंतु बस स्थानक कामाची वर्क ऑर्डर देऊनही तब्बल दहा महिन्याचा कालावधी पूर्ण होत आहे, यामध्ये संबंधित कामासाठी आवश्यक असलेले कार्यात्मक आराखडे तयार करणे, नकाशे तयार करणे यामध्येच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बीड विभागाकडून बांधकाम परवानगी देण्याबाबत जाणुन बुजून विलंब केला जात आहे असे निदर्शनास येत आहे. यामध्ये येथील सत्ताधारी यांचा राजकीय हस्तक्षेप असण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. विकास कामे मंजूर असूनही कामे सुरू करण्याबाबत परवानगी मिळू न देणे असे करून हजारो प्रवाशांची गैरसोय करून स्थानिक राज्यकर्त्यांना काय साध्य करायचे आहे. असा प्रश्न राजेभाऊ फड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात विचारत आहे. ***

# आगामी निवडणुकांत कॉंग्रेस पुर्ण ताकतीने उतरणार-अहमद चाऊस

## परळीत कॉंग्रेसच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांचा निर्धार



परळी वैजनाथ, (बातमीदार):- आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीत कॉंग्रेस पुर्ण ताकदीने उतरणार असुन सर्वच गट व गणांमध्ये सक्षम उमेदवार उतरवणार आहे.महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या पाठिशी कॉंग्रेस आपली ताकद लावणार असल्याचे कॉंग्रेसचे परळी विधानसभा प्रभारी अहमद चाऊस यांनी सांगितले.

परळी शहर व तालुका कॉंग्रेसची आढावा बैठक पार पडली. परळी विधानसभा प्रभारी अहमद चाऊस औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर यांच्या उपस्थितीत दि.३ ऑक्टोबर रोजी परळी येथील नवीन शासकीय विश्राम गृह शिवाजी चौक येथे दुपारी ३ वाजता पार पडली. या बैठकीत अंबाजोगाई शहर कॉंग्रेस अध्यक्ष, त्यांचे सहकारी सय्यद अतिक भाई, परळी तालुका अध्यक्ष प्रकाश मुंडे, परळी शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई, ओबिसी महाराष्ट्र उपाध्यक्ष वसंत मुंडे, महाराष्ट्र प्रदेश माजी सरचिटणीस अनिल मुंडे, माजी शहर अध्यक्ष प्रकाश देशमुख आदी पदाधिकार्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.चाऊस यांनी आगामी सर्व निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी तयारी करावी कॉंग्रेस पक्ष पूर्ण ताकदीनिशी पाठीशी उमेदवारांच्या पाठिशी उभा राहणार असल्याचे सांगितले. ***

# परळीत डेंग्यू व संसर्गजन्य रोगांचा वाढता प्रादुर्भाव; नगर पालिकेने तातडीने उपाययोजना कराव्यात-अॅड.मनोज संकाये

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरात डेंग्यू, मलेरिया, ताप, सर्दी-खोकला व आंत्रज्वर यांसारख्या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून नागरिक आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जात आहेत. पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचणे, नाल्यांची सफाई न होणे, चिखल व घाणीचे डबके तयार होणे यामुळे डासांचे प्रजनन मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांवर अनेक खोल खड्डे पडल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडचणी वाढल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर अॅड. मनोज संकायें मित्र मंडळ, परळी यांच्या वतीने



नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात शहरात तातडीने डास नियंत्रणासाठी शास्त्रोक्त फवारणी करावी, पावसामुळे साचलेले पाणी व चिखल हटवून योग्य साफसफाई करावी, तसेच खड्डेमय रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, परळी शहरात रस्त्यांची अवस्था खड्डेमय झाली असून त्यात पाणी साचल्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. यामुळे नागरिक आणि विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. दुसरीकडे, डासांचा प्रादुर्भाव वाढून रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शहरातील रुग्णालयांवर प्रचंड ताण पडत आहे. नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता सुरळीत राखण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे हे नगरपरिषद प्रशासनाचे कर्तव्य आहे. मात्र दुर्लक्ष केल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असा इशारा मित्र मंडळाने दिला आहे. निवेदनावर अॅड. मनोज संकायें यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या सह्या असून सर्वांनी मिळून परळीकरांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी नगरपरिषदेकडे ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यावेळी शिरीष सलगरे ,कैलास रिकीबे, संतोष कांबळे, गणेश गीते, देवदास मुंडे ,परमेश्वर मुंडे, बाळू मुंडे, मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.※

# शिक्षण, सहकार, समाजवादी विचार आणि लोकशाहीसाठी लढा देणारे नेतृत्व : कॉ.पी.एस.घाडगे

मराठवाड्यातील शिक्षक चळवळीचे झुंजार व लढाऊ नेते, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी अखंडपणे संघर्ष करणारे, सहकार क्षेत्रातील प्रामाणिक व लोकशाहीवादी नेतृत्व म्हणून सर्वपरिचित आदरणीय कॉ.पी.एस. घाडगे सर यांना ओळखले जाते. आज दि.२ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांचा वाढदिवस. खरंतर वाढदिवस साजरा करणे हे कॉ.पी.एस घाडगे सर यांच्या तत्वातही बसत नाही ते करीतही नाहीत. परंतु त्यांच्या वाढदिवसानिमित्त मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, सहकार व शिक्षक चळवळीतील योगदान निश्चितच आजच्या युवा पिढीला प्रेरणादायी आहे. कॉम्रेड पी.एस घाडगे सर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडण्याचा हा सुंदर क्षण आहे. त्यानिमित्त हा शब्द प्रपंच...

मराठवाड्यातील सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात कॉ.पी.एस.घाडगे सरांचे कार्य अत्यंत लक्षणीय व प्रेरणादायी आहे. शिक्षक, शेतकरी, कामगार, सहकारी संस्था व सामान्य जनतेसाठी संघर्ष करणारे हे नेतृत्व आजही तत्त्वनिष्ठ भूमिकेसाठी




ओळखले जाते. शिक्षक संघटनांमध्ये कार्य करत असताना सरांनी मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी शिक्षकांसाठी हक्काची लढाई दिली. मराठवाडा शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत अल्पमताने आमदारकी हातून गेली. तरीही त्यांनी मनोबल न गमावता संघर्षाची वाट धरली. सरांचे विचार नेहमीच समाजवादी व लोकशाही मूल्यांशी निष्ठावंत राहिले आहेत. कम्युनिस्ट चळवळीच्या प्रेरणेने त्यांनी शेतकरी-कामगार-शिक्षक यांच्या प्रश्नांना नेहमी प्राधान्य दिले. जातिवाद, धर्मांधता आणि हुकूमशाहीविरुद्ध त्यांनी उघडपणे आवाज उठवला. सत्यासाठी संघर्ष, तडजोड नाही ही त्यांची ठाम भूमिका आजही प्रेरणादायी आहे.

कॉ.पी.एस.घाडगे सरांनी सहकाराला केवळ आर्थिक संस्था नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने प्रगतीपथावर आहे. महात्मा जोतिबा फुले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्था ही त्यांनी उभी करून शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी नवे दालन उघडले. या संस्थांच्या कामकाजात प्रामाणिकपणा, पारदर्शकता व तत्त्वनिष्ठा यांना त्यांनी सर्वात महत्त्व दिले. घाडगे सरांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही संस्था चालवताना वैयक्तिक फायद्यापेक्षा संस्थेच्या व समाजाच्या हिताचा विचार करणे. त्यामुळेच त्यांच्यावर सहकारी, शिक्षक व समाजातील सर्व घटकांचा विश्वास आहे. घाडगे सरांनी लोकशाही मार्गाने एकता, बंधुता आणि समतेचे तत्त्व जपले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक चळवळींना योग्य दिशा मिळाली आहे.

कॉ.पी.एस.घाडगे सरांचा वैचारिक पाया समाजवाद व मार्क्सवादी तत्वज्ञानावर आधारित आहे. त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात कम्युनिस्ट पक्षाच्या संघटनात्मक चळवळीमधून केली. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर व शिक्षक यांच्या हक्कासाठी त्यांनी संघटित लढे उभारले. अन्याय, शोषण व असमानतेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. मराठवाड्यात सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता व समानतेचे तत्त्व रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने जनजागृती केली. पक्षाच्या राजकीय चळवळींमुळे ते जनतेशी थेट संपर्कात राहून लोकांच्या समस्या मांडणारे व त्यांचे निराकरण करण्यासाठी संघर्ष करणारे नेता ठरले. थोडक्यात कॉ.पी.एस.घाडगे सरांनी कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीच्या आधारे समाजातील अन्यायाविरुद्ध झुंजार लढे दिले व सहकार क्षेत्रात तत्त्वनिष्ठ आणि प्रामाणिक नेतृत्वाचे उदाहरण घालून दिले. आदरणीय कॉ.पी.एस.घाडगे सरांना उदंड निरोगी दीर्घायुष्य लाभो, त्यांच्या कार्यातून समाजाला पुढेही प्रेरणा मिळत राहो. याच वाढदिवसाच्या निमित्ताने मनपुर्वक मंगलमय हार्दिक शुभेच्छा..!


**– जगदीश शिंदे**
पत्रकार, परळी वैजनाथ.

## खरय.. पण...



दोन गोष्टी सोडून मैत्री करा
एक
**खोटेपणा**
आणि दोन
**मोठेपणा.!**

## हसरा कोपरा..!



अडचण अशी आहे
की आपल्याला
कर्ज बुडवून
परदेशात पळून
जायला पण
कर्ज काढावं
लागेल..!

संपादकीय...

# प्रशासनाचा ढिसाळपणा..!

**✻ सुविचार ✻**

**नाती फक्त रक्ताचीच असतात असे नाही, संकटात आपल्याला जी मदत करतात ती नाती सगळ्यात जास्त महत्वाची असतात.**

गेल्या गुरूवारी (दि.२) परळी येथील प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व ग्रामदैवत श्री कालरात्री देवीच्या पालखी मिरवणुकीने शहरात गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या विजयादशमी म्हणजे दसरा उत्सवाची सांगता झाली. दसऱ्याला श्री वैद्यनाथ व प्रभू वैद्यनाथाची बहीण म्हणून ओळख असलेल्या कालरात्री देवीची पालखी निघते. शेकडो वर्षाची ही परंपरा येथे आहे. श्री वैद्यनाथाची पालखी दसरा व महाशिवरात्रीला अशी वर्षातून दोनदा निघते. तर श्री कालरात्री देवीची पालखी वर्षातून एकदाच दसऱ्याला निघते. दसऱ्या दिवशी प्रभू श्री वैद्यनाथाची पालखी प्रथा-परंपरेप्रमाणे सायंकाळी मंदिरातून निघते. देशमुखपार, अंबेवेस, नांदूरवेस, गणेशपार, उखळवेस मार्गे श्री कालरात्री देवीच्या मंदिराजवळ ती येते. ही पालखी श्री कालरात्री देवी मंदिर परिसरात आल्यानंतर श्री वैद्यनाथ देवस्थान संस्थेच्या वतीने येथे शोभेची दारू उडवली जाते. प्रभू वैद्यनाथ व श्री कालरात्री देवीच्या पालख्या रात्री उशिरा पुढे बटूभैरव मंदिराकडे मार्गस्थ होतात. या दोन्ही पालख्या रात्री उशिरा पूर्व घाटावरून श्री वैद्यनाथ मंदिरात येतात. येथे आरती, पूजा, प्रदक्षिणा असे कार्यक्रम होतात. त्यानंतर श्री कालरात्री देवीची पालखी आपल्या मंदिराकडे मार्गस्थ होते. या दोन्ही पालख्यांच्या मिरवणुकीनंतर परळीतील नवरात्रोत्सवाची सांगता होते. अशी प्रथा व परंपरा येथे शेकडो वर्षापासून चालत आलेली आहे.

दरम्यान, परळीच्या जुन्या गावभागातील श्री कालरात्रीदेवी मंदिर परिसरात दसरा मैदानावर सायंकाळी परळीतील नागरिक एकत्र येतात. श्री कालरात्री देवीच्या पालखीचे दर्शन घेतात. त्यानंतर एकमेकांना आपट्याची पाने 'सोनं' म्हणून भेट देऊन दसरा, दिवाळीच्या शुभेच्छा देतात. प्रभू श्री वैद्यनाथ व श्री कालरात्री देवीच्या पालख्या या मैदानावरून पुढे निघाल्यानंतर या मैदानावर जमलेले नागरिक आपल्या घरी परतात. दरम्यान, याच दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिन असतो. त्यामुळे परिसरातील समाज मंदिरातही नागरिकांची गर्दी होते. दसऱ्या दिवशी सायंकाळी हजारो परळीकर या मैदानावर असतात. या मैदानाची स्वच्छता, दिवाबत्ती, जंतूनाशकाची फवारणी व इतर आवश्यक कामे परळी पालिकेमार्फत केली जातात. शिवाय येथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पुरेसा पोलिस बंदोबस्त या परिसरात असतो. अलिकडच्या काळात शहरातील विविध राजकीय पक्षाचे मंडप या मैदानावर नागरिकांना शुभेच्छा देण्यासाठी लागत आहेत. राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते आपल्या मंडपात उभे राहून नागरिकांना शुभेच्छा देतात. यामुळे या मैदानाच्या गर्दीत भरच पडली आहे.


या दसऱ्याला मात्र या मैदानाबाबत परळी पालिका व पोलिस प्रशासनाचा ढिसाळपणा, उदासिनता परळीतील नागरिकांना प्रकर्षाने जाणवली. यामुळे परळीकरांत प्रशासनाविरूद्ध तीव्र नाराजी व संताप व्यक्त होताना दिसला. या भागात दिवसेंदिवस अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे सर्वांचीच गैरसोय होते आहे. दसऱ्या दिवशी हजारो परळीकर येथे जमतात म्हणून या भागात मोठ-मोठे बॅनर लावले जातात. हे बॅनर लावताना पालिकेची परवानगी घेतली जाते का? हा प्रश्न पडतो तसेच पालिका प्रशासन असे बॅनर लावण्यासाठी परवानगी देते का? हा ही प्रश्न आहे. यातील अनेक बॅनर सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय करणारेच असतात. रस्त्यावरील वहातुकीला अडचणीचे ठरतात. दसऱ्याला हजारो नागरिक येथे एकत्र येतात हे माहित असूनही या दिवशी येथील हायमास्ट दिवे बंदच होते. शिवाय कालरात्री देवी मंदिर परिसरातून जाणाऱ्या गटारावर दरवर्षीप्रमाणे फरशी किंवा पत्र्याच्या प्लेट यंदा झाकल्या गेल्या नव्हत्या. यामुळे भाविक व नागरिकांची मोठी गैरसोय झाली. काहीजण गटारातही पडले. येथे गर्दी होते हे माहित असूनही रस्त्यावर व परिसरात मोठी वहाने पार्कींग करून ठेवली गेली. पालखी मार्गावर या वहानांची संख्या अधिक होती. यामुळे पालख्यांना अडचणी आल्या. अशी वहाने येथे नागरिकांची, भाविकांची मोठी गैरसोय करत होते. परंतु याबाबत पोलिस प्रशासन काहीच करत नव्हते. याचे नागरिकांना आश्चर्य वाटत होते. गटाराची दूर्गंधी, अस्वच्छता, अतिक्रमणे, गाड्यांची पार्कींग, परिसरातील रस्त्यावर पडलेले बांधकाम साहित्य यामुळे पालिकेचा व पोलिस प्रशासनाचा ढिसाळपणा येथे उत्सवावेळी दिसून आला. असा उदासिनतेचा व ढिसाळपणाचा प्रकार अलिकडे येथे वाढत असल्याने दसऱ्याला या मैदानावर होणाऱ्या गर्दीवर परिणाम झाला आहे. दरवर्षी सायंकाळी येथे येणाऱ्या नागरिकांची संख्या घटत चालली आहे. याकडे आता परळीतील जाणकार नागरिक, नेते, कार्यकर्ते, पुढारी यांनी लक्ष देण्याची व प्रशासनाला जाब विचारण्याची गरज आहे, असे सर्वसामान्य परळीकरांना वाटते. ✻✻✻

# दसरा,गांधी जयंती आणि बीड जिल्ह्याची सद्यस्थिती : संघर्ष, परंपरा आणि आशेचा दीप

बीड जिल्हा सध्या अतिवृष्टीच्या छायेत आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या, नाले तुडुंब भरून वाहत आहेत; अनेक शेतं पाण्याखाली गेली आहेत ; घरं, रस्ते, शिवार यांत पाणी साचले आहे. शेतकरी हवालदिल झाले आहे. पिके पाण्याखाली गेल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. पावसाच्या धारा कितीही जोरात कोसळल्या तरी मनातील आशेचा दिवा विझू देऊ नका. आजही गावोगावी पाणी साचले आहे, गावांचा संपर्क तुटलेला आहे, रस्ते बंद झाले आहेत. प्रशासन, पोलीस दल, महसूल विभाग सतत कार्यरत आहे. ग्रामपंचायत अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांच्यासह अधिकारी वर्ग मदतीसाठी दिवस-रात्र धावपळ करत आहे . मदतीसाठी नियंत्रण कक्ष सतत सुरू आहे.

दसरा किंवा विजयादशमी हा हिंदू संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे. प्राचीन काळापासून हा सण चांगल्याचा वाईटावर विजय दर्शवतो. रामायणानुसार प्रभू श्रीरामांनी याच दिवशी रावणाचा वध करून सीतेची सुटका केली आणि अयोध्येला परतताना हा दिवस विजयाचा उत्सव म्हणून साजरा करण्यात आला. महाभारतातील पांडवांनी अज्ञातवास संपल्यानंतर आपल्या शस्त्रांची पूजा करून पुन्हा युद्धात विजय मिळवण्यासाठी हा दिवस निवडला होता. त्यामुळे दसऱ्याला विजयादशमी असे नाव पडले. दसरा म्हणजे वाईट प्रवृत्तींचा पराभव आणि नवी सुरुवात करण्याचा दिवस. या दिवशी लोक रावण दहन करतात, सोन्याची पाने देवांना अर्पण करतात आणि एकमेकांना देतात, जे समृद्धी आणि ऐक्याचे प्रतीक आहे. रावण फुंकला की वाईट जळून खाक झाले, आता अंतःकरणातील भीती, राग, लोभ यांना ही जाळून टाका.

२ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधींचा जन्मदिन आहे. राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे मोहनदास करमचंद गांधी हे सत्य, अहिंसा आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात. गांधीजींनी दिलेली शिकवण सत्य : जीवनात सत्याला सर्वोच्च स्थान द्या, अहिंसा : हिंसेऐवजी शांततेने संघर्ष करा, स्वावलंबन : खादी, स्वदेशी



आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग निवडा, सहिष्णुता : सर्व धर्म, जात, समाज यांना समानतेने पाहा. आजच्या परिस्थितीत गांधीजींच्या शिकवणीचा खरा अर्थ आपल्याला जाणवतो. पूरस्थितीत एकमेकांना सहकार्य करणे, खोट्या अफवांवर विश्वास न ठेवणे, संयम राखणे हेच त्यांचे तत्त्वज्ञान होते. तुम्ही जगात पाहू इच्छिता तो बदल स्वतः घडवा! हा गांधीजींचा मंत्र आज अधिक महत्त्वाचा ठरतो.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अवस्था गंभीर आहे. घरात पाणी, शेतात पाणी, जनावरांसाठी चाराचा प्रश्न, अन्नधान्याची टंचाई अशा वेदनादायक परिस्थितीतही बीडकर खंबीरपणे उभे आहेत. तहसीलदार शेळके यांनी भावनिक आवाहन केले: तरुण मित्रांनी पुढे यावे; आपले हात मदतीसाठी पुढे करावेत. वृद्ध, निराधार, आजारी नागरिक यांना आधी मदत करावी . कोणत्याही परिस्थितीत जीवित हानी होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यावी. आपण सर्व खंबीर आहात; आपल्यातले बळ मला माहीत आहे. या संकटावर आपण एकत्रितपणे मात करू. प्रशासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. मदतीसाठी व संपर्कासाठी आपण नेहमी तयार आहोत. कधीही संपर्क साधा.

दसरा फक्त रावण दहन करण्याचा सण नाही, तर मनातील निराशा, भीती आणि अशक्तपणा जाळून टाकण्याचा दिवस आहे. आज या संकटाच्या काळात आपण एकत्र येऊन गावोगावी एकतेची मशाल पेटवूया. उद्याची पहाट सोनेरी आहे, आजचे ढग काळे आहेत तरी आशेचा किरण उगवेलच. गावात स्वच्छतेचे काम सुरू करावे, शेतातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने करून द्यावेत, पूर ओसरल्यानंतर पिण्याचे पाणी उकळून वापरावे, मुलांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे, प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. गांधीजींनी दिलेला स्वावलंबनाचा मंत्र आजही तितकाच उपयुक्त आहे. गावोगावी लोकांनी एकत्र येऊन परस्पर साहाय्य करावे, पूरग्रस्तांना अन्नधान्य, कपडे, औषधे यांची मदत द्यावी. सत्याग्रह हा केवळ संघर्ष नाही, तो स्वच्छ समाजासाठीची शपथ आहे.

पावसाचा जोर ओसरलाच पाहिजे, पण आपल्या मनातील जिद्द वाढली पाहिजे. दसऱ्याचा रावण जळतोच, पण मनातील भीती, नैराश्य आणि वेदना देखील जळल्या पाहिजेत. गांधीजींच्या मार्गावर चालून आपण पुन्हा एक नवा दिवस घडवूया. सोनेरी भवितव्याची पहाट आपल्यासाठी उगवेल या विश्वासानेच दसरा आणि गांधी जयंती साजरी करूया. या दसऱ्याला खरेदी कमी करा पण आशेचा दिवा जास्त लावा. गांधी जयंतीच्या दिवशी स्वतःशी वचन द्या मी माझ्या गावासाठी, माझ्या लोकांसाठी, माझ्या जिल्ह्यासाठी सदैव तयार राहीन !

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
✻ वर्ष ०९ ✻ अंक २२ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२५ ✻ किंमत : २ रू.

# जनसुरक्षा कायदा रद्द करा, ओला दुष्काळ जाहीर करा या मागणीसाठी महाविकास आघाडीचे परळीत निदर्शने

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाविकास आघाडी परळीच्या वतिने केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरण,जनसुरक्षा विदेयक कायदा रद्द, ओला दुष्काळ जाहीर करा ,विद्यार्थ्यांची परिक्षा फी माफी करा ही मागणी घेऊन परळीत जोरदार निदर्शने धरणे आंदोलन करण्यात आले.असुन प्रशासनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राज्यपालांना निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले असून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेचे पुजन करून धरणे आंदोलनाला सुरू करण्यात आले.जनसुरक्षा विधेयक रद्द करा, ओला दुष्काळ त्वरित जाहीर करा, विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करा, अडचणी सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करा याविषयी उपस्थित नेत्यांनी




सरकार विरोधात भाषणात प्रचंड प्रहार केला. या धरणे निदर्शनात कॉम्रेड पक्षाचे कॉ.पि.एस.घाडगे सर,कॉ.अजय बुरांडे, कॉंग्रेसचे नेते अँड.अनिल मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे उत्तम माने,तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, शिवसेना उबाठा गटाचे जगन्नाथ सोळंके, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई, तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे, महिला अध्यक्षा एच.यु.मुंडे,बी.जी. खाडे सर,पांडुरंग राठोड, मुक्ताराम गवळी,प्रकाश देशमुख, सावजी, इतेशाम खतीब, बद्दर भाई, फरकुंद अली बेग, गुलाम राव देवकर, बाबा शेख,रसुल खान,सुभाष देशमुख, दिपक सिरसाठ,सय्यद खाजा, जावेद शेख, अजमत अली,कॉं.मुरलीधर नागरगोजे, कॉं.विजयराज घुगे,कॉं.धनजय वाव्हळे, मज्जित पठाण, सौ.मंगल सोळंके, हनुमंत फड, महेश केंद्रे, यशवंत सोनवणे, जालिंदर गिरी, शेख अब्दुल,भानुदास देशमुख अदी महाविकास आघाडी व मित्र पक्षाचे मोठ्या संख्येने नेते कार्यकर्ते सहभागी होते. ***

# दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे-मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठवाड्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतिवृष्टीने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाचे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले आहे त्यामुळे मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या बाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेली माहिती अशी की, मराठवाड्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतिवृष्टीने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाचे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले आहे. शालांत माध्यमिक व उच्च प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी- मार्च २०२६ साठी आवेदनपत्र भरणे सुरू आहे. आस्मानी संकटात सर्वस्व गमावलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची परीक्षा फीस भरण्याची ऐपत शेतकऱ्यांमधे राहिलेली नाही. मराठवाड्यातील शेतकरी वर्गाला आता मदतीची गरज आहे. अशा कालखंडात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करून अतिवृष्टीग्रस्त मराठवाड्यास मदतीचा हात द्यावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आसल्याची माहिती अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. **

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) ९ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

बीड, (जिमाका):- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२५ परीक्षेचे आयोजन रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्याचे नियोजित आहे. सदर परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी दि. १५ सप्टेंबर २०२५ ते दि. ०३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत होता. परंतु महाराष्ट्रात काही जिल्हयामध्ये अतिवृष्टी व पुरस्थिती निर्माण झाल्याने परीक्षार्थी/उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास अडचणींना सामोरे जावे लागल्याने परीक्षार्थी/उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि. ०४ ऑक्टोबर २०२५ ते दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११:५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच विद्यार्थी/उमेदवारांना तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा शुल्क भरता न आल्यामुळे संबंधित परीक्षार्थी उमेदवारांना नेट बँकिंग/डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड द्वारे दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११:५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही. संबंधित परीक्षार्थी/उमेदवारांनी याची नोंद घ्यावी असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे-०४ च्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. ***

# समाजमाध्यमांतून अतिवृष्टी यादीच्या चुकीच्या आफवांवर नागरिकांनी विश्वास न ठेवण्याचे आवाहन

बीड (जिमाका):- बीड जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनास निधी मागणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ करण्यात येईल, याची आवश्यक खबरदारी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.दरम्यान समाजमाध्यमांवर बीड जिल्ह्यातील माहे सप्टेंबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर यादी प्रशासनामार्फत तयार केलेली नाही या यादीबाहेरील गावांमध्ये नुकसान झालेले नाही असा चुकीचा संदेश समाजमाध्यमांतून प्रसारित होत आहे. त्यामुळे याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना स्पष्ट करण्यात येते की,व्हायरल होत असलेली यादी अधिकृत नसून प्रशासनाने ती जारी केलेली नाही. पंचनामे अद्याप सुरू असून नुकसानीबाबतची माहिती शासनास योग्य मार्गाने सादर केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनास सहकार्य करावे व केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच माहितीचा स्वीकार करावा. जिल्हा प्रशासन नागरिकांच्या पाठीशी आहे व शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे. **

## दरवळणारा सुगंध...



**वाद कितीही असला तरी चालेल,**
**संवाद सुरू असावा**
**कारण वादातून का होईना**
**संवाद असतोचं.**
**पण, अबोला मात्र नात संपवतो.**
**म्हणून नातं टिकवताना संवाद**
**मिटू देऊ नये...**
**संवाद मिटला की नातं गुदमरायला**
**लागतं..!!**

# भारताचे पंतप्रधान स्व.लालबहादूर शास्त्री : साधी राहणी, उच्च विचारसरणी

**खाजगी कामासाठी १५ किलोमीटर सरकारच्या गाडीचा उपयोग झाला तेव्हा आपल्या पत्नीला त्या खर्चाची रक्कम सरकारी कोषात भरायला सांगणारे, दुष्काळात आठवड्यातून १ दिवस पुर्णतः भुखे राहणारे, पत्नीला फाटलेल्या शर्टापासून मला याचा रुमाल तयार करून दे म्हणणारे, शेतकरी आणि जवान हे खरे राष्ट्रनिर्माते असल्याचे ओळखून जय जवान जय किसान नारा देणारे, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ९ वर्ष जेल मध्ये राहणारे.**

उंचीने कमी मात्र कर्तुत्वाने श्रेष्ठ व्यक्तिमत्व असलेल्या शास्त्रीजींच्या बाबतीत 'मूर्ती छोटी, कीर्ती महान' असेही कौतुकाने म्हटले जाई. वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षी महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित झालेल्या शास्त्रीजींनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. राष्ट्राच्या दृष्टीकोनातून सैनिक आणि शेतकरी यांचे महत्व लक्षात घेता, दोघांच्याही सन्मानार्थ त्यांनी जारी केलेली 'जय जवान, जय किसान' ही घोषणा आजही लोकप्रिय ठरते.

लाल बहादूर शास्त्री...थोर स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री. लाल बहाद्दूर यांचा जन्म २ ऑक्टोंबर १९०४ राजी झाला. बालपण आणि संपूर्ण आयुष्य अतिशय साधेपणाने गेले. ९ जून १९६४ साली ते भारताचे पंतप्रधान झाले पंडित जवाहरलाल नेहरूंच्या निधनानंतर त्यांची पंतप्रधानपदी निवड झाली. १९६५ च्या भारत-पाक युद्धात भारतीय जवानांच्या पाठीशी समर्थपणे उभे राहत, त्यांनी राबविलेल्या मुत्सद्दी धोरणाच्या जोरावर पाकला चारी मुंड्या चित् करून भारतीय सैन्याने विजय मिळविला.आणि १९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध त्यांच्या काळात झाले. हे युद्ध अजून काही दिवस चालले असते पाकिस्तान हा देश जगाच्या नकाशावरून संपूर्णपणे नष्ट झाला असता. त्या आधी त्यांनी उत्तर



प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारीही समर्थपणे पेलली होती. त्यांच्या कर्तबगारीवर त्यांनी राष्ट्रीय राजकारणात स्थान मिळविले. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात रेल्वेमंत्री म्हणूनही त्यांनी काम पहिले. एका दुर्दैवी रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी राजीनामा दिला होता. अशा प्रकारे राजीनामा देण्याची ही देशातील पहिलीच घटना होती. १९६५ च्या युद्धातील विजयानंतर सोविएत रशियाने मध्यस्ती केली आणि तत्कालीन सोविएत संघातील ताश्कंद येथे युद्धबंदी करण्यासाठी भारत-पाक शांतीचर्चा घडवून आणली. ह्याच दरम्यान ताश्कंद येथे हृदयविकाराचे एकामागोमाग दोन तीव्र झटके आल्याने ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. त्यावेळी अवघे ६ आणे खिशात होते .स्वत:साठी काहीही न मागे ठेवता दौ-यावर असताना त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला. संपूर्ण जगाला त्यांचा मृत्यू हृदयविकाराने झाला असे सांगण्यात आले, परंतु त्यांच्या पत्नी ललिता शास्त्री व मुलगा सुनील शास्त्री यांच्या मतानुसार लाल बहादूर शास्त्रीवर विषप्रयोग झाला होता. यासाठी त्यांच्या स्वयंपाक्याला अटक करण्यात आली परंतु नंतर निर्दोष मुक्तता करण्यात आली. ताश्कंद करावर सही कारण लाल बहादूर शास्त्रीना मान्य नव्हत पण त्यांना मजबुरीने त्यावर सही करावी लागली व त्यामुळेच त्यांनी आत्महत्या केली असावी किंवा सदर बाबतीचा धक्का घेतल्याने त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा. आजपर्यंत भारत सरकार ने सुरक्षेचे कारण देऊन त्या घटनेचा अहवाल जगासमोर आणलेला नाही. असे हे उत्तुंग व्यक्तीमत्व. साधी राहणी, उच्च विचारसरणी. देशाचे पंतप्रधान असूनही कोणतीही संपत्ति त्यांच्या नावावर जमा नव्हती उलट कर्जच काढून ते घर चालवत. ''जय जवान, जय किसान'' असा अनोखा नारा देत त्यांनी जवान आणि किसान हेच देशाचे भविष्य असल्याचे देशाला पटवून दिले होते जनतेला जिंकणारा भारतीय पंतप्रधान स्व लाल बहादूर शास्त्री हे एकच उदाहरण आहे. राष्ट्राप्रती त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पूज्यनीय स्वातंत्र्य सेनानी माजी पंतप्रधान श्री लालबहादुर शास्त्रीजींच्या जयंती निमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.!

**जय जवान,जय किसान..!**

**(संग्रहीत)**